# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, गडचिरोली
दिनांक-१५/०२/२०१९

## गडचिरोली पोलीस दलाच्या पुढाकाराने गाव दत्तक योजनेतुन होणार दुर्गम भागातील गावाचा विकास

- मा. पोलीस अधीक्षक, शैलेश बलकवडे यांनी घेतले कसनासुर गाव

गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहुल नक्षलग्रस्त असुन बहुतांश भाग हा अतिदुर्गम व नक्षलदृष्टया संवेदनशिल आहे. नागरिकांच्या अनभिज्ञतेमुळे शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या विविध योजनेचा लाभ अजुनही दुर्गम भागात पोहचत नाही. त्यामुळे आदिवासी नागरिकांना मुलभुत समस्यापासुन वंचित राहावे लागते याचा विचार करुन गडचिरोली पोलीस दलाने अतिदुर्गम भागात शासनाच्या योजना व उपक्रम पोचवण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक, शैलेश बलकवडे यांच्या संकल्पनेतुन ‘‘गाव दत्तक योजना’’ सुरु केली आहे.

गाव दत्तक योजनेअंतर्गत गडचिरोली जिल्हयातील अतिदुर्गम भागातील ०५ गावाची निवड करण्यात आली असुन भामरागड तालुक्यातील कसनासुर हे गाव मा. पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांनी दत्तक घेतलेले आहे. या योजने अंतर्गत गावातील मुलभुत समस्या जसे पाणी, वीज, आरोग्य, रस्ते, पुल, शिक्षण, बस सुविधा, रोजगार, कृषी/सिंचन, विविध दाखले इत्यादी समस्यांची माहीती ग्रामभेटी दरम्यान गोळा करुन त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासोबतच गावातील नागरिकांना गावपातळीवर रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी गावातील गरजु नागरिकांना मधमाशापालन, कुक्कुटपालन यासारखे कुटीरउदयोग व लघुउदयोग उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

गावदत्तक योजनेत समाविष्ट गाव भविष्यात गडचिरोली जिल्हयात आदर्श गाव म्हणुन ओळखला जावा यासाठी गडचिरोली पोलीस विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येणार आहे.

